| MHSN060009292024 | Miraj City Police Station<br>PWDVA Appln./31/2024<br>Rupali Babaso Sakate Vs. Sachin Babaso Sakate |
|---|---|

## निशाणी १५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज जाबदार नं. १ यांनी कु. शामली व कु. अव्यानी यांची भेट मिळणेकरीता तसेच शालेय सुट्टी व सणाच्या कालावधीमध्ये तात्पुरता ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. जाबदारतर्फे वकिल श्री. आय. बी. पालेगार आणि अर्जदारतर्फे श्री. एस. एस. वाटवे यांचा युक्तीवाद ऐकला.

३. जाबदार कथन करतात की, अर्जदार या जाबदार नं. १ यांच्या पत्नी असून अर्जदार व जाबदार नं. १ यांना त्यांचे विवाह संबंधातून कु. शामली व अव्यानी अशी दोन अपत्ये आहेत. जाबदार यांना वडील म्हणून कु. अव्यानी व कु. शामली यांचेशी प्रेम आपुलकी आहे. तसेच दोन्ही मुलीना देखील जाबदार यांचेशी प्रेम व आपुलकी आहे. दोन्ही मुली या सध्या अज्ञान आहेत. सदर दोन्ही मुलीना जाबदार नं. १ यांची वडील म्हणून सहवासाची आवश्यकता आहे. मुलींना चांगले संस्कार देणेकरीता वडील म्हणून जाबदार नं. १ यांची नितांत आवश्यकता आहे. दोन्ही मुली व जाबदार नं. १ यांचे भविष्यात भावनिक तसेच वडील व मुली या नात्याकरीता दोन्ही मुलींची भेट जाबदार नं. १ यांना होणे आवश्यक आहे. जाबदार हे त्यांचे दोन्ही मुलींना न्यायालयाचे आदेशाप्रमाणे भेटणेस तयार आहेत. तसेच जाबदार नं. १ हे ज्यावेळी मुलींना शालेय सुट्टी असेल, दिवाळी, गणपती, तसेच हिंदू धर्मातील इतर जे

सण असतात व ज्यावेळी सदर सणाकरीता सुट्टी असेल त्यावेळी सदर जाबदार नं. १ हे त्यांचे दोन्ही मुलींना त्यांचे घरी पुणे येथे घेऊन जाणेस इच्छूक आहेत. तसेच सदरचे प्रकरण प्रलंबित असताना ज्या ज्या वेळी न्यायालय प्रस्तुत प्रकरणाची चौकशीकरीता सदरचे प्रकरण नेमले जाईल त्या त्या प्रत्येक तारखेस जाबदार नं. १ यांना कु. शामली व कु. अव्यानी यांची न्यायालय परिसरात भेटीस परवानगी देणेत यावी अशी विनंती केली आहे.

५. याऊलट अर्जदारतर्फे जाबदार नं. १ यांनी दाखल केलेल्या प्रस्तुत अर्जास म्हणणे (निशाणी २३) देऊन आक्षेप घेतला आहे. अर्जदार यांनी जाबदारच्या अर्जातील कथने नाकारली आहेत. अर्जदार कथन करते की, वास्तविक जाबदार हे वडील म्हणून नेहमीच आपल्या दोन्ही मुलींची काळजी व जबाबदारी घेण्यास असक्षम ठरले आहेत. तसेच पुढे कथन करते की, अर्जदारांना मुलगा न झाल्यामुळे ते दोन्ही मुलीना नेहमी आपल्या डोक्यावरचे ओझे समजत आले आहेत. तसेच पुढे असेही कथन करते की, दोन्ही मुली एकत्र राहत असताना वडील म्हणून त्यांनी कधीच आपल्या मुलींची काळजी केली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. यातील अर्जदार हिने जाबदार यांचेविरुध्द महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम १२ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. यातील अर्जदार व जाबदार नं. १ यांच्या विवाहासंबंधातून झालेले अपत्य कु. शामली वय वर्षे १३ व कु. अव्यानी वय वर्षे ६ ही दोन्हीही अपत्ये सध्या अर्जदार हिचेकडे आहेत. यातील जाबदार यांनी वडील या नात्याने त्यांच्या दोन्ही मुलींची भेट मिळावी म्हणून विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे जाबदार यांनी त्यांच्या मुलींचा सहवास मिळावा म्हणून सुट्टीच्या कालावधीमध्ये मुलींचा तात्पुरता ताबा मिळावा अशी विनंती केलेली आहे. तसेच अर्जदार हिने जाबदार नं. १ यांनी कधीही दोन्ही मुलींची चौकशी केली

नाही. तसेच त्यांची जबाबदारी घेतली नसल्याचे कथन केलेले आहे. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २१ प्रमाणे व्यथीत व्यक्ती हिला किंवा तिच्यामार्फत अर्ज करणा–या व्यक्तीस मुलांच्या अंतरिम ताब्याबाबत आदेश पारीत करता येऊ शकतात. तसेच जाबदार यास जर न्यायालयास योग्य वाटेल त्यावेळी मुलांच्या भेटीकरीता परवानगी देऊ शकतात. त्यामुळे यातील जाबदार नं. १ हा कु. शामली व कु. अव्यानी यांचा नैसर्गिक पिता असून जाबदार नं. १ यास मुलींचा पिता म्हणून केवळ भेटण्याची परवानगी देणे योग्य व न्यायोचित असे वाटते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि.क्र. १५ चा अर्ज अंशतः मंजुर करणेत येतो.

२. जाबदार नं. १ यास कु. शामली व कु. अव्यानी यांना दर महिन्याच्या तिस–या शनिवारी न्यायालय परिसरात दुपारी २.०० ते ४.०० या कालावधीमध्ये भेटण्यास परवानगी देण्यात येते.

३. अर्जदार हिस निर्देश देण्यात येते की, मुलींच्या भेटीकरीता मुलींना वर नमूद कालावधीमध्ये व दिवशी न्यायालयात मुलींसह उपस्थित राहावे. तसेच ज्यावेळी शक्य नसेल त्यादिवशी त्याची पुर्वकल्पना जाबदार यांना द्यावी.

४. अर्जदार व जाबदार नं. १ यास निर्देश देण्यात येतो की, सदर भेटीच्या दरम्यान त्यांनी सलोखा राखावा व कोणताही गैरप्रकार होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घ्यावी.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.11.04 17:42:51 +0530

ठिकाण –मिरज. (अनिरुध्द एस. राणे)
दिनांक –०३.११.२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज